**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टे सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०१ । मंगळवार १ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## कायद्यात सुधारणांसाठी नगरमध्ये ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा मूक मोर्चा

### पारोळ्यातील घटनेने सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर, विविध मागण्यांचे निवेदन सादर






(छाया : राजू खरपुडे)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्रामसभेत जमावाच्या हल्ल्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांचा हृदयविकाराने दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघ, जिल्हा शाखा अहिल्यानगरच्या वतीने आज, मंगळवारी मूक मोर्चा काढून विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात प्रशासकीय व कायदेशीर सुधारणांच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या. संघटनेच्या वतीने १८ ऑगस्ट २०२६ पासून जिल्ह्यातील सर्व ग्रामसभांच्या कामकाजावर ठाम बहिष्कार टाकण्यात आला आहे.

जमावाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्या मृत्यूला कारणीभूत असणाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करून हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, वर्षातून १० ते १२ वेळा होणाऱ्या ग्रामसभांऐवजी वर्षातून फक्त एकच आर्थिक नियोजन व आढावा ग्रामसभा घेण्याची तरतूद करावी, ग्रामसभेत त्रयस्थ व्यक्तींकडून सोशल मीडियासाठी होणाऱ्या अनधिकृत व्हिडिओ चित्रीकरणावर कायदेशीर बंदी घालावी, संवेदनशील ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांसाठी सक्तीचे व विनामूल्य पोलीस संरक्षण मिळावे, रिक्त पदे भरणे, एक ग्रामपंचायत–एक अधिकारी नियमानुसार पदनिर्मिती, सजेची फेररचना, आणि वैयक्तिक लाभाच्या योजनांची लाभार्थी निवड ग्रामसभेऐवजी तालुका स्तरावरून पारदर्शकपणे करावी, इतर विभागांच्या योजनांच्या विशेष ग्रामसभांची जबाबदारी संबंधित विभागांकडे सोपवावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. जिल्हाध्यक्ष व सरचिटणीस यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन मोर्चेकऱ्यांनी सादर केले.

## एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीची सखोल चौकशी करा

### दोषींवर कठोर कारवाईसह गैरप्रकारातून झालेल्या निवडी रद्द करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक गट–ब परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गैरप्रकाराचा लाभ घेऊन निवड झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित निवडी रद्द कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे लाखो विद्यार्थी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांतील असून, आई–वडिलांच्या कष्टाच्या पैशातून वर्षानुवर्षे अभ्यास करून अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र पैसे देऊन प्रश्नपत्रिका मिळवून गैरप्रकाराचा फायदा घेता येत असेल, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या ■ पान ४ वर

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका

### स्थानिक गुन्हे शाखेची जामखेड शहरात कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे डांबून ठेवलेल्या ५ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई करत सुटका केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून, एका आरोपीला अटक केली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अरूण गांगुर्डे, मनोज साखरे, भाऊसाहेब काळे, रोहित मिसाळ आणि दिपक जाधव यांचे पथक जामखेड परिसरात ग्रस्त घालत असताना, ■ पान ४ वर

## अवैध गुटखा विक्रेत्यांवर सुपा, श्रीगोंद्यात छापे

### पाचजणांवर गुन्हा दाखल, ४९ हजार ९३६ रुपयांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रेत्यांवर सुपा आणि श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करून एकूण ४९ हजार ९३६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड आणि अंमलदारांच्या दोन विशेष पथकांनी ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे सुपा व श्रीगोंदा परिसरात ३ ठिकाणी छापे टाकले. ■ पान ४ वर

## नेवाशात १७० किलो गांजासह ५० झाडे जप्त

### नेवासा पोलिसांची कारवाई, शेतमालकावर गुन्हा दाखल



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा पोलिसांनी वडुले गावच्या शिवारात १७० किलो गांजासह गांजाची सुमारे ५० झाले जप्त केली. बबन शंकर देशमुख (वय ६०) हे स्वतःच्या शेतात गांजाची बेकायदेशीर शेती करून तो सुकवून विकत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ३१ ऑगस्ट रोजी शेतात छापा टाकला असता, ४० ते ५० गांजाची जिवंत झाडे आणि वाळवलेला गांजा असा एकूण १७० किलो मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी आरोपीवर अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात ■ पान ४ वर

## पालकमंत्री डॉ. विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; भुईकोट किल्ला विकासाला गती

### महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा; ऐतिहासिक वारसा जपत पर्यटन सुविधांचा होणार कायापालट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष असलेल्या भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा रखडलेला मार्ग आता मोकळा झाला आहे. भुईकोट किल्ला विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभाग यांच्यात सामंजस्य करार () संपन्न झाला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि स्टेशन कमांडर पी. सुनील कुमार यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील लष्कराच्या मुख्यालयात हा करार करण्यात आला. या करारामुळे किल्ल्याच्या संवर्धनासोबतच पर्यटनाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून भुईकोट किल्ल्याचा विकास करण्याची घोषणा केली होती. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय



या आंदोलनात ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर युवराज पाटील अशोक नरसाळे आदींसह जिल्ह्यातून आलेले ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेअंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला १७ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली होती. मात्र, भुईकोट किल्ला लष्कराच्या अखत्यारीत

> ''अहिल्यानगर जिल्ह्यात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्याकडे पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला होता.यासाठी त्यांचे सहकार्य मिळाले.पर्यटनातून रोजगार निर्मिती करण्याचा आपला प्रयत्न असून, जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक, नैसर्गिक आणि अध्यात्मिक वारसा स्थळांचा विकास करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहे.''
> **डॉ. राधाकृष्ण विखे पाटील,** पालकमंत्री

असल्याने प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यासाठी लष्कराची अंतिम परवानगी आवश्यक होती. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब झाला. आता महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा ■ पान ४ वर

**कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!**
गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !
**राघव लोन सर्व्हिसेस**
व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)
सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा
जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा
▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते







**विनातारण कर्ज**
▸ व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
▸ डॉक्टर लोन
▸ आकर्षक व्याजदर

**तारण कर्ज**
▸ घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
▸ आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज

**वाहन कर्ज**
▸ नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
▸ व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान

विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो

सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल
अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम | ओ.बी.सी. महामंडळ योजना
(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)

नियम व अटी लागू
700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य
कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे
आम्ही संपुर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो
नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !

अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285
पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

## दै. आकर्षण निवडक

### हरिनाम सप्ताहात आरोग्यसेवेचा जागर; मोफत नेत्र तपासणी करुन गरजूंवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया




अहिल्यानगर- ग्रामीण भागातील वाडी-वस्तीवरील नागरिकांना आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने जिल्हाभर मोफत नेत्र तपासणी शिबिरे राबविणाऱ्या पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्थेच्या वतीने आंबेवाडी पावन गणपती (ता. पाथर्डी) येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला भाविकांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संस्थेचे हे २६३ वे शिबिर होते. तपासणीदरम्यान मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या गरजू रुग्णांवर पुणे येथे केली जाणार आहे. कै. सुखदेव माधवराव वेताळ यांच्या स्मरणार्थ या आरोग्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याचा फायदा घेत त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्याचा स्तुत्य उपक्रम संस्थेच्या वतीने राबविण्यात आला. विशेषतः ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना वेळेत नेत्र तपासणी व उपचार मिळावेत, यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने विविध गावांमध्ये शिबिरे घेतली जात आहेत.या शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष मेजर शिवाजी वेताळ व सुभेदार मेजर संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविक व ग्रामस्थांची नेत्र तपासणी करण्यात आली. नेत्रविकार असलेल्या रुग्णांना आवश्यक उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तपासणीत मोतिबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची नोंद करून पुढील उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे. डॉ. कोरडे यांनी ग्रामस्थांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करताना डोळ्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, नेत्रविकारांची लक्षणे कोणती, नियमित नेत्र तपासणीचे महत्त्व काय आहे, याबाबत माहिती दिली. यावेळी मयुर चव्हाण, अनिल चव्हाण, दिलीप राठोड, अंबादास चव्हाण, संजय चव्हाण, विमल चव्हाण, लीलाबाई चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अहिल्यानगरच्या सुनील पावले यांना विश्वकर्मा पुरस्कार जाहीर



अहिल्यानगर - विश्वकर्मा सोशल वेलफेअर फौंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा मानाचा विश्वकर्मा पुरस्कार यंदा अहिल्यानगरचे समाज भूषण श्री. सुनील अविनाश पावले यांना जाहीर झाला आहे.फौंडेशन गेली १२ वर्षे सामाजिक कार्यात कार्यरत असून विद्यार्थी गुणगौरव, समाज भूषण पुरस्कार, वृक्षारोपण, रक्तदान अशा विविध उपक्रम राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून विविध क्षेत्रात प्रसिद्धीपासून दूर राहून उल्लेखनीय व समाजभूषण कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.श्री. पावले यांनी कृषी क्षेत्रात ३४ वर्षे शासकीय सेवा बजावली असून काव्य लेखन, कथा लेखन असे छंद जोपासत पुरस्कारही प्राप्त केले आहेत. शासकीय संस्था, सहकारी पतसंस्था तसेच जिव्हाळा प्रतिष्ठानसारख्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधित्व करीत त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.हा पुरस्कार सोहळा व विद्यार्थी गुणगौरव समारंभ दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.संस्थापक विश्वस्त विवेकानंद पांडुरंग सुतार यांनी ही माहिती दिली आहे.

### हेमंत सूर्यकांत धोका यांचे निधन



अहिल्यानगर- येथील आनंद ट्रान्स्पोर्ट, ट्रॅव्हल्स तसेच विणा वर्ल्ड एजन्सीचे संचालक हेमंत सूर्यकांत धोका यांचे शनिवार दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. ते ४५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात वडील सूर्यकांत धोका, पत्नी, दोन मुलं काव्या आणि नीरज धोका, बंधू ईश्वर, निलेश, पियुष,अक्षय असा परिवार आहे. त्यांच्यावर रविवारी सकाळी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## जनतेचे प्रश्न सोडवून भाजप महिला मोर्चाची संघटनात्मक ताकद वाढवा; वैशाली चव्हाण यांचे आवाहन

**प्रथम राष्ट्र , द्वितीय पक्ष आणि नंतर आपण , या भावनेतून तळागाळात काम करा – वैशाली चव्हाण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, महिला तसेच समाजातील तळागाळातील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचे काम महिला कार्यकर्त्यांनी हाती घ्यावे. त्याचबरोबर जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने जनसंपर्क ठेवावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव तथा अहिल्यानगर जिल्हा प्रभारी सौ. वैशाली चव्हाण यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शना खाली अहिल्यानगर येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सौ. प्रिया जानवे होत्या. यावेळी सावेडी मंडल, केडगाव मंडल सरचिटणीस कल्याणी ठुबे भिंगार मंडल अध्यक्षा सौ ज्योत्स्ना मुंगी तसेच मध्य मंडल अध्यक्षा सो सुरेखा जंगम या चारही मंडलांचे संघटनात्मक बैठक घेण्यात आली.व पदाधिकाऱ्यांकडून कामाची माहिती जाणून घेण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना सौ. वैशाली चव्हाण म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने समाजातील विविध घटकांसाठी अनेक कल्याण कारी योजना सुरू केल्या आहेत. लाडकी बहीण योजना, महिलांना एसटी प्रवासात सवलत, उज्ज्वला योजना, लेक लाडकी योजना, मुद्रांक शुल्कात सवलत, महिला सन्मान योजना, उमेद अभियान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना तसेच महिला शेतकरी सक्षमीकरण अशा विविध योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांना मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक महिला कार्यकर्त्याने स्वीकारावी.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामुळे पक्षाला मोठी ताकद मिळाली आहे. मात्र, केवळ वरिष्ठ नेत्यांच्या नावावर पक्षाचे काम चालेल, या भ्रमात कोणीही राहू नये. 'प्रथम राष्ट्र, द्वितीय पक्ष आणि नंतर आपण' या ब्रीदवाक्याने प्रत्येक कार्यकर्त्याने तळागाळातील जनतेसाठी काम केले पाहिजे. पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा नियमित आढावा प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. चित्रा वाघ यांच्याकडे पाठवावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक उत्सव, विविध समाजांचे उत्सव, चौकाचौकातील मंडळे, महिला मंडळे, भजनी मंडळे, लग्नसमारंभ, व्याख्याने आणि विविध संमेलने अशा ठिकाणी कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन सामान्य नागरिकांशी संवाद साधावा. त्यांच्या अडचणी आणि प्रश्न जाणून घेऊन पक्षाच्या माध्यमातून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. सतत जनतेच्या संपर्कात राहिल्यानेच पक्षाची संघटनात्मक ताकद वाढेल, असेही चव्हाण यांनी सांगितले.

प्रारंभी सौ. स्वाती सिरसुल यांनी जिल्हा प्रभारी सौ. वैशाली चव्हाण यांचा परिचय करून दिला. श्रीरामपूर येथील सामान्य कुटुंबातून आलेल्या वैशाली चव्हाण यांनी गेल्या १५ ते २० वर्षांपासून भारतीय जनता पार्टीसाठी तन–मन–धनाने काम केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची श्रीरामपूर तालुका अध्यक्षपदी पाच वर्षांसाठी नियुक्ती झाली.

**प्रभाग क्रमांक १० मध्ये विकासकामांना गती**

## प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावणार – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

**वर्षानुवर्षे रखडलेल्या वंजार गल्लीतील रस्त्याला अखेर मुहूर्त**

**नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील वंजार गल्ली परिसरातील वर्षानुवर्षे रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर गती मिळाली आहे. नागरिकांच्या दैनंदिन अडचणींचा विचार करून नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते या कामाचे उद्घाटन करण्यात आले. रस्त्याचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

वंजार गल्ली परिसरातील रस्त्याची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली होती. रस्त्याच्या समस्येमुळे नागरिकांना दैनंदिन ये–जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अधिक बिकट होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व्हावे, अशी नागरिकांची मागणी होती. नगरसेवक सागर मुर्तडकर यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा करून अखेर रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

या कामाच्या उद्घाटन सोहळ्यास उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सागर मुर्तडकर, नगरसेविका मयुरीताई जाधव, नगरसेविका शीतलताई ढोणे, संजय ढोणे, भाजप नेते बाबासाहेब सानप, सूरज जाधव, कुस्ती संघटनेचे वैभव लांडगे, श्रीकांत फंड, निलेश खांडरे, शुभम गंगेकर, सचिन दिवटे, ज्ञानेश्वर ढापसे, जगन्नाथ शेट बजाज, बिहानी शेठ, भाजपचे ज्येष्ठ नेते अनिल गट्टानी, गणेश शेठ कांबळे, शरद मुर्तडकर, विनाताई ढापसे, उमेश काळे, गणेश भाऊ भिंगारदिवे, हरिभाऊ जुम्मेवाले यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, प्रभाग क्रमांक १० मध्ये भाजपचे तीन नगरसेवक बहुमताने निवडून आल्यानंतर परिसरातील विकासकामांना वेग आला आहे. वंजार गल्लीसह प्रभागातील अनेक भागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध विकासकामे प्रलंबित होती. मात्र, सागर मुर्तडकर नगरसेवक झाल्यानंतर नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत.

अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित असलेल्या भागाला आता सागर मुर्तडकर यांच्या माध्यमातून विकासाची गती मिळत आहे. प्रभागातील प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावले जातील, असा विश्वास धनंजय जाधव यांनी व्यक्त केला. वंजार गल्लीतील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ता सुस्थितीत झाल्यानंतर नागरिकांची दैनंदिन वाहतूक अधिक सुलभ होणार असून, ये–जा करताना होणाऱ्या अडचणी कमी होतील. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या कामाला सुरुवात झाल्याने नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी सांगितले.नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या प्रयत्नातून रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि प्रभागातील प्रलंबित विकासकामांना प्राधान्य देऊन कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.प्रभाग क्रमांक १० मधील विविध भागांमध्ये रस्ते, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न सोडविण्याची गरज असून, उपलब्ध निधी व प्रशासकीय प्रक्रियेनुसार विकासकामांना गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वंजार गल्लीतील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण हे त्याचाच एक भाग मानला जात आहे. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, रखडलेल्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याबद्दल नागरिकांनी नगरसेवक सागर मुर्तडकर यांचे आभार व्यक्त केले.

## जिल्ह्यातील जातीयवादी प्रवृत्ती थोपविण्यासाठी महाविकास आघाडीच्या वरिष्ठांशी चर्चा करणार – राजेंद्र गवई



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील जातीयवादी प्रवृत्ती थोपविण्यासाठी महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून व्यापक चळवळीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सरचिटणीस राजेंद्र गवई यांनी केले. शहरासह जिल्ह्यात समाजात अशांतता पसरविण्यासाठी सुरू असलेल्या जातीयवादी प्रवृत्तीचा त्यांनी निषेध नोंदविला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संवाद बैठक रविवारी (दि. ३० ऑगस्ट) शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत राजेंद्र गवई बोलत होते. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, दानिश शेख, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, अजीम खान, सचिन शिंदे, स्वप्नील साठे, शुभम ठोंबे, नजीर देशमुख, लकी वाघमारे, राहुल ठोकळ, प्रकाश थोरात, जमीर सय्यद, जावेद सय्यद, योहान चाबुकस्वार, अजीज शेख, अरबाज शेख, हुसेन चौधरी, सुशील म्हस्के, चिकू गायकवाड, महिला शहर जिल्हाध्यक्षा ज्योती पवार, संपदा म्हस्के, ताई पगारे, मनीषा गायकवाड, कमल वाघमारे, पूजा साठे, वाश्रांति पठारे, रेश्मा जाधव, शितल नाटिकर, रिना पाटोळे, सारिका साळवे, सोनाली बनसोडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना राजेंद्र गवई म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन पक्षाचे काम सुरू आहे. संविधानविरोधी जातीयवादी पक्षांबरोबर न जाता पक्षाच्या विचारधारेने कार्य सुरू आहे. सत्तेची हवा पाहून त्याबरोबर वाहिलो नाही. विचारांवर ठाम राहिल्याने सत्तेबरोबर गेले नाही. आंबेडकरी चळवळीचा विचार पुढे घेऊन काम सुरू आहे.

**तेलवाडीत साकारणार पैठण बाजार समितीचा उपबाजार**

## कांदा व मोसंबी मार्केटला प्राधान्य; जमीन हस्तांतरण अंतिम टप्प्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून तालुक्यातील तेलवाडी येथे गट क्रमांक १५ मधील शासकीय गायरान जमीन बाजार समितीकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. या ठिकाणी आधुनिक सुविधांनी सुसज्ज उपबाजार उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रस्तावित उपबाजारात कांदा व मोसंबी मार्केटला प्राधान्य देण्यात येणार असून शेतमालाची आवक, वजन, खरेदी–विक्री, साठवणूक आदींसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी हक्काचे बाजारपेठ उपलब्ध होऊन व्यापाऱ्यांनाही व्यवसायाच्या नव्या संधी मिळणार आहेत. बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे, उपसभापती राम पाटील एरेडे, सचिव नितीन विखे व संतोष बोठे पदाधिकाऱ्यांनी तेलवाडी येथील प्रस्तावित जागेची पाहणी करून विकासकामांबाबत चर्चा केली.

## मोबाईलमध्ये न गुंतता मैदानी खेळांना महत्त्व द्या – मीनाताई मुनोत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वांबोरी येथील अ. ए. सोसायटीच्या महेश मुनोत माध्यमिक विद्यालयात विद्यालयाचे माजी चेअरमन कै. वसंतलालजी मुथा यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिमापूजन, अभिवादन व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विठ्ठलदासजी झंवर होते. प्रमुख अतिथी म्हणून नगर मर्चंट्स बँकेच्या माजी चेअरमन तथा संचालिका श्रीमती मीनाताई मुनोत उपस्थित होत्या. आनंदऋषीजी म.सा. जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या १०० विद्यार्थिनींचाही यावेळी गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती मीनाताई मुनोत म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये अधिक वेळ न गुंतता मैदानी खेळ व शारीरिक श्रमांना महत्त्व द्यावे. महिलांनी स्वतःला कधीही कमजोर समजू नये. मुले व मुली हे समाजरूपी रथाची दोन चाके असून, विद्यार्थ्यांनी योग्य ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत.राहुरी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. ऋषिकेश मोरे यांनी कै. वसंतलालजी मुथा हे उत्कृष्ट विधिज्ञ, शिस्तप्रिय व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व होते, असे सांगून विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातील चांगले गुण आत्मसात करावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमास हेमंतभाऊ मुथा,बबलुशेठ मुथा, ॲड. तात्यासाहेब डोळसे, ॲड. ऋषिकेश मोरे, प्राचार्या शुभांगी देशपांडे, उपप्राचार्या वनिता बोऱ्हाडे, पर्यवेक्षक सुधाकर वाबळे, अ. ए. सोसायटी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीना पवार यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

## तिसऱ्या सोमवारी ढोकेश्वर मंदिरात भक्तीचा महासागर!

**हजारो भाविकांनी घेतले श्री ढोकेश्वराचे दर्शन; कुस्त्यांच्या हंगामाने यात्रेला रंगत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर–** ढोकी येथील डोंगराच्या कुशीत वसलेल्या ऐतिहासिक व पुरातन श्री ढोकेश्वर मंदिरात आज तिसऱ्या सोमवारी मोठी यात्रा उत्साहात पार पडली. अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे, नगर, मुंबई परिसरातून हजारो भाविकांनी मंदिरात दाखल होत श्री ढोकेश्वराचे दर्शन घेतले. सकाळपासूनच मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने गजबजून गेला होता.

श्री ढोकेश्वर मंदिर हे पुरातन लेणीमध्ये वसलेले असून या मंदिराला धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व आहे. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी डोंगराच्या पायथ्यापासून अनेक पायऱ्या चढून जावे लागते. पावसाळ्यामुळे परिसर हिरवाईने नटला असून डोंगराच्या कुशीत वसलेले मंदिर, आजूबाजूचा निसर्ग आणि हिरवाई यामुळे यात्रेचे वातावरण अधिकच मनमोहक झाले होते.

यात्रेनिमित्त परिसरातील विविध गावांसह जिल्हाभरातून भाविक मोठ्या संख्येने आले होते. अनेक भाविकांनी पायऱ्या चढत श्री ढोकेश्वराचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. यात्रेचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे कुस्त्यांचा हंगामा. गावोगावचे मल्ल या कुस्तीच्या आखाड्यात सहभागी झाले होते. मल्लांच्या रंगतदार कुस्त्या पाहण्यासाठी कुस्तीप्रेमी आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिराची देखभाल पुरातत्त्व विभागामार्फत केली जाते. मंदिरातील पुजारी गोसावी बाबा हे दररोज सकाळ–संध्याकाळ श्री ढोकेश्वराची पूजा–अर्चा करतात. तिसऱ्या सोमवारीही विधिवत पूजा–अर्चा करण्यात आली.श्रद्धा, परंपरा आणि निसर्गसौंदर्याचा सुंदर संगम असलेल्या श्री ढोकेश्वर मंदिराच्या यात्रेने आज टाकळी ढोकेश्वर परिसर भक्तिमय झाला होता.


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### तलाव कोरडे, चारा पाणी टंचाईचे सावट जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी : ठोंबरे




अहिल्यानगर - यंदा पावसाने पाठ फिरवल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक भागात चारा पाणी टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. अत्यल्प पावसामुळे विहिरी, तलाव, बोअरवेल व इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी झाल्याने शेतीसह पशुधनाच्या चारा पाण्याचा गंभीर प्रश्न शेतकर्‍यांसमोर उभा राहिला आहे. सोयाबीन, तूर यांसारखी पिके पावसाअभावी जळू लागल्याने शेतकर्‍यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ पाहत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. ही भयावह परिस्थिती पाहता शासनाने तातडीने अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळ ग्रस्त व पाणीटंचाई ग्रस्त गावांचा आढावा घेऊन गावोगावी जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ ठोंबरे यांनी केली आहे. सुरुवातीला झालेल्या अल्पशा पावसावर शेतकर्‍यांनी पेरण्या केल्या, मात्र त्यानंतर पावसाने दीर्घकाळ आजतागायत उघड दिल्याने आवश्यक ओलावा न मिळाल्याने परिणामी अनेक भागात पिकांनी माना टाकल्या आहेत. त्यामुळे शेतकर्‍यांपुढे आडात नाही तर पोहर्‍यात कुठून येईल? या पाणी टंचाई व चारा टंचाईमुळे पशुधन कसे वाचवावे? हा गंभीर प्रश्न शेतकर्‍यांसमोर उभा राहिला आहे. याचा शासनाने गांभीर्याने विचार करून जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी रघुनाथ ठोंबरे, अमोल घिगे, दादासाहेब ठोंबरे, संतोष घिगे, बाळासाहेब ठोंबरे, प्रदीप खरात, मेसू उबाळे या शेतकर्‍यांनी केली आहे.

### महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार पतसंस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र दगडखैर



अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्या., शेवगावच्या चेअरमनपदी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर (शेवगाव), व्हाईस चेअरमनपदी सय्यद अफसरपाशा (पुणे) आणि मानद सचिवपदी बापूसाहेब जगदाळे (श्रीरामपूर) यांची बिनविरोध निवड झाली. सर्व संचालकांच्या एकमताने झालेल्या या निवडीमुळे संस्थेच्या पदाधिकार्‍यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नवीन चेअरमन, व्हाईस चेअरमन व मानद सचिवांच्या निवडीसाठी नुकतीच तांत्रिक भवन, अहिल्यानगर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संबंधित पदांसाठी उमेदवारी अर्ज मागविण्यात आले. चेअरमनपदासाठी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर, व्हाईस चेअरमनपदासाठी सय्यद अफसरपाशा तसेच मानद सचिवपदासाठी बापूसाहेब जगदाळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज प्राप्त झाले. प्रत्येक पदासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्याने आणि सर्व संचालकांनी एकमत दर्शविल्याने तिन्ही पदांवरील निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले. संस्थेच्या कारभाराची जबाबदारी आता नूतन पदाधिकार्‍यांच्या नेतृत्वाखाली पुढे जाणार आहे. ही निवड प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे सहाय्यक निबंधक बाळकृष्ण शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रक्रिया पूर्ण केली. संस्थेचे कार्यकारी संचालक अरुण इंगळे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, सेवकवृंद तसेच सदिच्छा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### शारदाताई सपकाळ यांचे निधन



अहिल्यानगर- राहुरी येथील कै. शारदाताई गुलाबराव सपकाळ यांचे रविवारी (दि.३० ऑगस्ट) अल्पशः आजाराने निधन झाले. त्या ८७ वर्षाच्या होत्या. त्यांचा अंत्यविधी गणपती घाट, राहुरी येथे करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मनमिळावू स्वभाव व धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने ते सर्वांना सुपरिचित होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भिंगार अहिल्यानगर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या त्या चुलत्या होत्या.

# श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त निसर्गरम्य गोरक्षनाथ गडावर भाविकांची गर्दी

**विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने मंदिर परिसर उजळला; आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते महाआरती । देवस्थान ट्रस्टकडून भाविकांना महाप्रसादाचे वाटप; सुमारे एक लाख भाविकांनी घेतले दर्शन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरापासून अवघ्या वीस किलोमीटर अंतरावर असलेला श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे निसर्गरम्य वातावरणासोबतच अध्यात्मिकतेचे केंद्रबिंदू म्हणून भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त गोरक्षनाथ गडावर राज्यभरातून भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभर 'गोरक्षनाथ महाराज की जय'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच फुलांनी मंदिराची व होमाची सजावट करण्यात आल्याने मंदिर परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते. आकर्षक सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरली.यावेळी आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाली. महाआरतीच्या वेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. आरतीनंतर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

अहिल्यानगर शहरापासून जवळ असल्यामुळे तसेच निसर्गरम्य आणि आध्यात्मिक वातावरणामुळे श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर वर्षभर भाविकांची वर्दळ असते. गोरक्षनाथ महाराजांची महती महान असून होमाची दैवशक्ती सर्वांनाच परिचित आहे. श्रावण महिन्यात विशेषतः भाविक मोठ्या श्रद्धेने गोरक्षनाथांच्या दर्शनासाठी गडावर येत असतात.

राज्यभरातून येणाऱ्या भाविकांसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भाविकांना दर्शन घेताना कोणतीही अडचण होऊ नये यासाठी देवस्थानच्या माध्यमातून आवश्यक नियोजन करण्यात आले.
याबाबत देवस्थानचे सचिव गोरक्षनाथ कदम म्हणाले की, श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त सुमारे एक लाख भाविकांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडाचे दर्शन घेतले. राज्यभरातून आलेल्या भाविकांसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने आवश्यक त्या सर्व सुख-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.श्रावणी सोमवारच्या निमित्ताने गोरक्षनाथ गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दर्शन, महाआरती, महाप्रसाद आणि मंदिराची आकर्षक सजावट यामुळे संपूर्ण परिसराला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

## गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी राजू बोंबले यांची बिनविरोध निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** आमदार विलास बापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना-भाजप सार्वजनिक गणेश महासंघाची बैठक उत्साहात पार पडली. यावेळी महासंघाच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी राजूभाऊ बोंबले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शिवसेना-भाजप सार्वजनिक गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष योगराज बालासिंग बुंदिले, माजी अध्यक्ष राजूभाऊ गायकवाड, पदम खंदारे, विलास महाराज मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळांच्या विविध समस्या, उत्सवाचे नियोजन तसेच सामाजिक उपक्रमांबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी उपाध्यक्षपदी कुणाल पिंपळे, तर स्वागताध्यक्षपदी सुनील काकडे यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आगामी गणेशोत्सवात शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना सोबत घेऊन विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# आईच्या प्रोत्साहनामुळे प्रा. शिंदे जीवनात यशस्वी

**जाधवर ग्रुपद्वारे भामाबाई शिंदेंचा गौरव**



**पुणे–** चौंडीसारख्या खेडेगावात काबाडकष्टातच निम्मे-अधिक जीवन व्यतित झाले असताना परिस्थितीवर मात करीत मुलगा शिकला पाहिजे म्हणून अपार कष्ट सोसून भामाबाई शिंदे यांनी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना कायम प्रोत्साहन देण्याचे काम केले. आईच्या या पाठबळावरच त्यांनी अनेकविध राजकीय पदांच्या माध्यमातून समाजोपयोगी कामे करीत जीवनात यश मिळवले, असे गौरवोद्गार पुणे येथील जाधवर ग्रुपद्वारे व्यक्त करण्यात आले. या ग्रुपद्वारे सभापती प्रा. शिंदे यांच्या मातुःश्री भामाबाई शिंदे यांना आदर्श माता पुरस्कार देण्यात आला. यावेळी भामाबाई शिंदे व सभापती प्रा. शिंदे या माय-लेकाच्या कष्टसाध्य वाटचालीचे कौतुक करण्यात आले.

पुणे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल (नर्हे) येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्यावतीने आयोजित ८वा आदर्श माता पुरस्कार सोहळ्यात सभापती प्रा. शिंदे यांच्या मातुःश्री श्रीमती भामाबाई शंकरराव शिंदे यांना आदर्श माता पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आदर्श माता पुरस्कार प्राप्त श्रीमती सुनीताताई लांजेकर, श्रीमती स्वातीताई निम्हण आणि ज्योतीताई कदम यांचाही सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलमताई गोर्हे, सप्तसिंधू महिला आधार बाल संगोपन शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ममताताई सपकाळ, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. कर्तृत्वाच्या प्रत्येक शिखरामागे आईच्या त्यागाची, निःशब्द कष्टांची आणि न दिसणाऱ्या संघर्षाची कहाणी असते. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून मुलांच्या स्वप्नांना बळ देणारी आई हीच कुटुंबाची आणि समाजाची खरी शिल्पकार असते, असे गौरवोद्गार जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांनी यावेळी व्यक्त केले.

दरम्यान, जाधवर ग्रुपद्वारे आईच्या केलेल्या सन्मानाबद्दल सभापती प्रा. शिंदे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आईच्या सन्मानाचा क्षण माझ्यासाठी आणि संपूर्ण शिंदे कुटुंबासाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा आहे. जाधवर ग्रुप यांनीही मातोश्रींच्या संस्कारांचा आणि माझ्या जडणघडणीतील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला, त्याचा विशेष आनंद झाला. मुलाला जन्म देणे ही निसर्गाची देणगी; पण त्याला माणूस म्हणून घडवणे, संस्कार देणे, परिस्थितीशी झुंजायला शिकवणे आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर खंबीरपणे साथ देणे ही आईच्या अथक तपःश्चर्येची फलश्रुती असते, असे स्पष्ट करून प्रा. शिंदे म्हणाले, माझ्या आयुष्याच्या जडणघडणीत मातोश्रींच्या संस्कारांचा वाटा शब्दांत व्यक्त करता येणार नाही. आज त्यांच्या कर्तृत्वाचा झालेला हा सन्मान माझ्यासाठी कोणत्याही पदापेक्षा मोठा आणि मनाला स्पर्शून जाणारा आहे. आईचा गौरव म्हणजे एका आयुष्यभराच्या त्यागाला मिळालेली मानवंदना आणि तिच्या संस्कारांतून घडणार्‍या पिढीला दिलेला आशीर्वाद, असे भावनिक भाष्यही प्रा. शिंदे यांनी केले.

# तोफखाना पोलीस ठाण्यात रक्षाबंधन उत्सव उत्साहात

**ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलच्या २२ विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना बांधल्या राख्या**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण तोफखाना पोलीस ठाण्यात आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमधील ऑक्झिलियम युवा चळवळीच्या २२ विद्यार्थिनींनी तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस बांधवांना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले. या उपक्रमातून विद्यार्थिनींनी समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.

सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० ते ११ या वेळेत हा रक्षाबंधन उत्सव पार पडला. विद्यार्थिनींसोबत प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सिस्टर रेश्मा, शिक्षिका रिया, सिस्टर बेट्सी , शिक्षिका नम्रता तसेच शिक्षक मयूर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी 'शॉवर्स ऑफ ब्लेसिंग्ज' हे भक्तिगीत सादर केले. भक्तिगीतामुळे कार्यक्रमस्थळी भक्तिमय आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले. त्यानंतर विद्यार्थिनींनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

पोलीस कर्मचारी समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने कार्यरत असतात. सण-उत्सवांच्या काळात नागरिक आपल्या कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करत असताना पोलीस कर्मचारी मात्र आपले कर्तव्य बजावत असतात. अशा कर्तव्यनिष्ठ पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन साजरे करून विद्यार्थिनींनी त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

राखी बांधताना विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता, तर पोलीस कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. या प्रसंगी विद्यार्थिनी आणि पोलीस कर्मचारी यांच्यामध्ये आपुलकीचे व स्नेहाचे वातावरण निर्माण झाले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पोलीस बांधवांशी निर्माण झालेला हा भावनिक स्नेह विद्यार्थिनींसाठी विशेष अनुभव ठरला.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याची आणि समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जवळून ओळख झाली. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा बजावत असलेली भूमिका विद्यार्थिनींना समजून घेता आली. त्याचबरोबर समाजातील विविध घटकांप्रती आदर, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेची भावना जपण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, संरक्षण आणि आपुलकीच्या भावनेचा उत्सव आहे. याच भावनेचा व्यापक अर्थ विद्यार्थिनींनी या उपक्रमातून प्रत्यक्ष कृतीतून मांडला. समाजाच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या पोलीस बांधवांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या सेवेला विद्यार्थिनींनी अनोखी मानवंदना दिली. शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, माणुसकी, संवेदनशीलता आणि कर्तव्य बजावणाऱ्या व्यक्तींबद्दल आदर निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. प्रेम आणि कृतज्ञतेच्या भावनेतून पार पडलेल्या या उपक्रमामुळे रक्षाबंधनाचा सण अधिक अर्थपूर्ण झाला.

सकाळी ११ वाजता कार्यक्रमाची सांगता झाली. आनंद, प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेच्या भावनेने पार पडलेला हा रक्षाबंधन उत्सव विद्यार्थिनी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

## गोरक्षनाथ कराळे यांची ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पोखर्डी येथील तरुण गोरक्षनाथ कराळे यांनी सुरवातीपासून वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा दिला.आता त्यांच्यावर समाजसेवक ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया)च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची महत्वपूर्ण जबाबदारी देऊन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील वाहन चालक वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री.कराळे यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात जय संघर्ष वाहन चालक-मालक संघटनाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदापासून केली. त्यानंतर त्यांनी जन सेवा ड्रायव्हर पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. वाहन चालकांच्या हक्क व हितासाठी, तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने आणि उपोषणे करून चालकांना न्याय मिळवून दिला आहे.

त्यांच्या या प्रदीर्घ सामाजिक अनुभवाची आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) चे अध्यक्ष श्री.प्रवीण तिवारी, महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री.गोरख कल्हापुरे तसेच ट्रस्ट चे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या सर्वानुमते श्री.कराळे यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली आहे.

चालकांच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचा निर्धार व्यक्त करून आपल्या नियुक्तीबद्दल बोलताना गोरक्षनाथ कराळे म्हणाले, ''वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या विविध समस्या सोडवून, गरजूंना तातडीने मदत पोहोचवणे आणि रस्त्यांवर होणाऱ्या अपघातातील बाधितांना वेळेत हॉस्पिटलमध्ये दाखल करून त्यांचे प्राण वाचवणे, हे मी माझे प्राथमिक कर्तव्य मानतो. नवीन जबाबदारीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील वाहन चालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या प्रश्नांसाठी, कल्याणासाठी आणि विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी काम करीत राहीन.'' असे सांगितले.
या निवडीबद्दल त्यांचे विविध चालक संघटना, सामाजिक संस्था, सर्व सामान्य नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अहिल्या सरस्वती महोत्सवात घडले इतिहास संस्कृती, परंपरा आणि आधुनिकतेचे दर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** क्षेत्र कोणतेही असो स्त्री ही स्वकर्तृत्वाने अधिक कणखर, सक्षमच असते. इतिहासातील अहिल्यादेवींपासून ते आताच्या आधुनिक काळातील पोलिस, वकील, डॉक्टर, न्यायाधीश, शेतकरी, कॉर्पोरेट वुमन, गृहिणी अशा सर्वच महिला स्त्री शक्तीच्या आदर्श आहेत. समाजात स्त्री शक्तीप्रती कायम आदर व्यक्त व्हावा या संदेशासह आणि एक सक्षम व्यक्ती म्हणून तिचे असलेले महत्त्व अधोरेखित करणारी अतिशय सुंदर जिवंत नाटिका रविवारी अहिल्या सरस्वती महोत्सवात सादर झाली. या महोत्सवातून अहिल्यादेवींच्या लेकींचा आत्मविश्वास, दृढता, संस्कृती परंपराप्रती असलेली बांधिलकी आणि आधुनिक युगातील आव्हाने पेलण्याची ताकद उपस्थितांना पहायला मिळाली

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पुढाकाराने झालेल्या या अहिल्या सरस्वती महोत्सवात महिलांना मुक्त व्यासपीठ देऊन त्यांना निखळ आनंदाची संस्मरणीय भेट देण्यात आली. सुरूवातीला सादर झालेल्या नाटिकेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची एंट्री सर्वांना इतिहासात नेणारी ठरली. अहिल्या नगरमध्ये साक्षात अहिल्यादेवी आल्याचा अनुभव सर्वांनी घेतला. त्यांच्या देदीप्यमान इतिहासाचा कालखंड उलगडत नाटिकेत अहिल्यादेवींच्या कर्तृत्ववाचा वारसा आधुनिक काळात पुढे चालवणाऱ्या महिला शक्तीचे दर्शन सर्वांना झाले.
नंदनवन लॉन्स येथील या महोत्सवातील फॅशन शो सुद्धा अहिल्यानगरच्या परंपरेला साजेसा झाला. फॅशन इंडस्ट्रीतील रॅम्प वाक हा अनेकांसाठी आकर्षणाचा विषय असतो. नगरमध्ये असाच दर्जेदार व दिमाखदार असा रॅम्प वाक प्रत्यक्ष पाहण्याची, अनुभवण्याची संधी नगरकरांना मिळाली. गीतसंगीताच्या तालावर युवती, महिला, कपल्स, गरोदर माता, आई व मुलगी, डॉक्टर अशा सर्वांनीच नजाकतदार, रूबाबदार आणि डौलदार रॅम्प वॉक करून फॅशन रनवेचा आनंद लुटला. मराठमोळा साज शृंगार, मिस मॅच वॉक, प्रिन्सेस वॉक, श्रीमान मेन्स वॉकमध्ये प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि आनंद पहायला मिळाला. पारंपरिक व आधुनिक फॅशनचा हा अनोखा संगम लक्षवेधी ठरला.
याप्रसंगी ॲड. मोनिका पंकज आशिया, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उपमहापौर धनंजय जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ . प्राजक्ता जाधव, मनपा स्थायी समितीच्या माजी सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव, संजय जाधव, टायटल स्पॉन्सर महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, श्रद्धा देडगावकर, अल्पना कासवा, मिनाताई सत्रे, मुंदडा, रचना काकडे, गुणाली मुथा, विचार भारतीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# अ.ए. सोसायटी अध्यापक विद्यालयाचे सुयश; पवित्र पोर्टलद्वारे २५ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड

## टीईटी परीक्षेतील यशानंतर गुणवत्तेनुसार विविध जिल्ह्यांत शिक्षक म्हणून संधी; विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड झाली आहे. राज्यातील विविध जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार शिक्षक म्हणून निवड झाली आहे. या यशामुळे अध्यापक विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसह स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या यशस्वी परंपरेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या टीईटी परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक म्हणून निवडण्यात आले. यामध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मेरीटनुसार झालेल्या या निवडीमध्ये प्रीतम काळे, रोहित दळवी, प्रवीण मिसाळ, सोनाली दातीर, अमृता कदम, सचिन बडे, गायत्री खराडे, नाजीया मण्यार, विकास गायकवाड, नवनाथ भुजबळ, सुहास मुरडे, अभय औटे, तनुजा तांबे, रुपाली झिंजुर्के, वैभव मोरे, मयुरी धनगर, कोमल नालकोल, शीतल गवळी, सलमान मोमीन, आकाश धलपे, आदित्य दारकुंडे, रेणुका खंडागळे, ओम जहऱ्हाड, विष्णू रजपूत आणि रोहिणी कांडेकर यांची शिक्षकपदी निवड झाली आहे.

पवित्र पोर्टलच्या आणखी दोन फेऱ्या होणार असून, या फेऱ्यांमधूनही अध्यापक विद्यालयातील आणखी अनेक विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध जिल्हा परिषद शाळा, महानगरपालिका शाळा तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक म्हणून रुजू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे.

अध्यापक विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सातत्याने मार्गदर्शन केले जाते. टीईटी, टेट, सीटेट अशा विविध परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी या परीक्षांमध्ये यश संपादन केलेले माजी विद्यार्थी तसेच शासकीय सेवेत अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या व्याख्यानांचे आयोजन विद्यालयात केले जाते. परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, तयारीची दिशा आणि परीक्षेत यश मिळविण्यासाठी आवश्यक बाबी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत असल्याने त्यांना मोठा फायदा होत आहे.

मागील शिक्षक भरती प्रक्रियेतही अध्यापक विद्यालयातील १५ विद्यार्थी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक म्हणून रुजू झाले होते. या अध्यापक विद्यालयातून आजपर्यंत अनेक विद्यार्थी एमपीएससी परीक्षेत यश मिळवून विविध शासकीय सेवांमध्ये अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. शिक्षक भरतीसह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी सातत्याने मिळविलेले यश ही विद्यालयाची उल्लेखनीय शैक्षणिक परंपरा मानली जात आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी परीक्षांमध्ये मिळविलेले हे यश संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे द्योतक ठरत आहे. योग्य मार्गदर्शन, दर्जेदार शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांसाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देण्यावर विद्यालयाचा सातत्याने भर आहे. एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्येही स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी विद्यालयात विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया मॅडम, सहकार्यवाह श्री. गौरव फिरोदिया साहेब, खजिनदार व शाळा समिती चेअरमन श्री. प्रकाशजी गांधी साहेब, संस्था विश्वस्त व शाळा समिती सदस्य श्री. गौरव मिरीकर साहेब, श्रीमती सुनंदाताई भालेराव मॅडम, विद्यालयाचे प्राचार्य श्री. संदीप उबाळे सर, सर्व सदस्य, पदाधिकारी तसेच शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. संस्थेच्या पदाधिकारी, प्राचार्य आणि शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन, प्रेरणा आणि प्रोत्साहन यामुळे विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण यश संपादन केले आहे.

तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), संगमनेर, जिल्हा अहिल्यानगरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर साहेब, ज्येष्ठ अधिव्याख्याता व सेवा पूर्व विभाग प्रमुख श्री. औटीसाहेब तसेच सांख्यिकीय विभाग प्रमुख श्री. नितीनजी टिळेकर यांनी प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया मॅडम तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थी, प्राचार्य श्री. संदीप उबाळे सर आणि सर्व स्टाफचे अभिनंदन केले आहे.

अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये मिळविलेले हे यश संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीचे प्रतीक ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनविण्यावर विद्यालयाचा भर आहे. पवित्र पोर्टलद्वारे २५ विद्यार्थ्यांची शिक्षकपदी झालेली निवड ही विद्यालयाच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची फलश्रुती असून, या यशामुळे अध्यापक विद्यालयाने आपली यशस्वी परंपरा पुन्हा एकदा कायम राखली आहे.

### रिक्त शिक्षक पदांवर खासदार नीलेश लंके आक्रमक

# आश्वासन नको, शिक्षक कधी मिळणार ते सांगा!

## जिल्ह्यातील ९६३ रिक्त पदांचा प्रश्न ऐरणीवर । विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी जिल्हा परिषदेसमोर निर्णायक लढा सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरणे, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता भार कमी करणे आणि विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबविण्याच्या मागणीसाठी खासदार निलेश लंके यांनी जिल्हा परिषद प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. 'कार्यवाही सुरू आहे' किंवा 'नियोजन केले आहे', अशी आश्वासने नकोत; विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षक कधी मिळणार, याची निश्चित तारीख जाहीर करा, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. शिक्षकांच्या रिक्त पदांच्या प्रश्नावर खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारपासून (दि. १) जिल्हा परिषदेसमोर निर्णायक लढा सुरू करण्यात आला आहे. पहिल्याच दिवशी विविध राजकीय, सामाजिक व शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून या आंदोलनाला पाठिंबा दिला.

खासदार लंके यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे शिक्षकांच्या रिक्त पदांबाबत सविस्तर माहिती व ठोस कृती आराखडा मागितला होता. त्यावर शिक्षण विभागाने ३१ ऑगस्ट रोजी दिलेल्या उत्तरानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील १५० संस्थांनी तब्बल ९६३ रिक्त शिक्षक पदांच्या जाहिराती नोंदविल्या आहेत. तर २७ ऑगस्ट रोजी केवळ १४ संस्थांमधील ३३१ रिक्त पदांसाठी उमेदवारांची शिफारस झाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

या आकडेवारीवरून खासदार लंके यांनी प्रशासनाला थेट सवाल केला आहे. ९६३ पदांची जाहिरात झाली असताना केवळ ३३१ पदांसाठी उमेदवारांची शिफारस झाली आहे. मग उर्वरित ६३२ पदांचे काय, ती पदे नेमकी कधी भरली जाणार, याची निश्चित तारीख प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

शिक्षकांची जाहिरात निघणे आणि शिक्षक प्रत्यक्ष वर्गात रुजू होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. विद्यार्थ्यांना जाहिरातीत शिक्षक नकोत, तर वर्गात शिक्षक हवेत. त्यामुळे शिक्षक प्रत्यक्ष शाळेत रुजू होण्याची अंतिम तारीख जाहीर झाली पाहिजे, असे खासदार लंके यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये कलाशिक्षक आणि क्रीडा शिक्षकांची पदेही मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला आणि क्रीडा शिक्षण महत्त्वाचे असताना ही पदे दीर्घकाळ रिक्त राहणे गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# संतसेना महाराज पुण्यतिथी निमित्त आमदार राजळे आमंत्रित



(छाया– सतिष जगताप )

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी सांप्रदायातील संत श्रेष्ठ श्री संतसेना महाराज यांचा पुण्यतीथी सोहळा खरवंडी कासार येथे मंगळवार दि .८ सप्टेबर रोजी संपन्न होत आहे त्या निमित्त पाथर्डी – शेवगाव विद्यमान आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांना खरवंडी कासार नाभिक संघटनेच्या वतीने या सोहळ्या निमित्त प्रमुख अतिथी म्हणुन आमंत्रित केले आहे सदर पुण्यतिथी सोहळा मंगळवार दि ८ सप्टेंबर रोजी संपन्न होत असुन सकाळी सात वाजता संतसेना महाराज यांच्या मुर्तिचा जलाभिषेक करून सकाळी नऊ वाजता संतसेना महाराज यांच्या प्रतिमेची सवाद्य भव्य मिरवणुक तर सकाळी ११ते१२ सालसिद्धेश्वर संस्थाण (मिडसांगवी )महंत हभप हनुमंत महाराज शास्त्री यांची प्रवचन सेवा संपन्न होणार आहे .तरी खरवंडी कासार सह परिसरातील भाविकांनी या पुण्यतीथी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे अवाहन नाभिक सेवा संघटना वतीने करण्यात आले आहे खरवंडी कासार येथे संतसेना महाराज यांचे मंदीर अद्यावत झाले असून दरवर्षी पुण्यतीथी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

# मोबाईल, सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवा

## पैठण शहरातील विद्यार्थ्यांना पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांचे मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** मोबाईल आणि सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग झाले असले, तरी त्याचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक आणि सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम करू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मीडियाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक आणि मर्यादित करावा, असे आवाहन पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले.

पैठण शहरातील शाळेत विद्यार्थ्यांसाठी मोबाईल व सोशल मीडियाच्या अतिवापराबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गोमारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत किशोरवयात मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे मानसिक, शैक्षणिक व सामाजिक परिणाम समजावून सांगितले. मोबाईलचा वापर अभ्यास, ज्ञानवृद्धी तसेच सकारात्मक उपक्रमांसाठी करण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

सोशल मीडियावरील माहितीची सत्यता तपासूनच तिच्यावर विश्वास ठेवावा. अनोळखी व्यक्तींशी संपर्क टाळावा तसेच वैयक्तिक माहिती सोशल मीडियावर शेअर करू नये, असेही पोलीस निरीक्षक गोमारे यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक आणि सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# पर्यावरणाची हाक : निसर्गाचा सन्मान, शाडू मातीचा मोरया!

## स्नेहबंध फौंडेशनच्या पोस्टरचे अनावरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आगामी गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा आणि जलप्रदूषणाला आळा बसावा, या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे 'शाडू मातीचा मोरया' या विशेष जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. 'निसर्गाचा सन्मान, शाडू मातीचा मोरया! घरातच विसर्जन, हाच खरा उत्सव साजरा!' हा संदेश देणाऱ्या जनजागृती पोस्टरचे अनावरण जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, ''गणेशोत्सव हा श्रद्धा आणि आनंदाचा सण आहे. मात्र, उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे भान ठेवणेही तितकेच गरजेचे आहे. नागरिकांनी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करावा आणि शक्यतो घरच्या घरीच विसर्जन करावे. स्नेहबंध फौंडेशनचा हा उपक्रम नक्कीच प्रेरणादायी आहे.''

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, ''पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आज काळाची गरज बनली आहे. नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींचा वापर पूर्णपणे टाळून शाडू मातीच्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. घरातच विसर्जन करून जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे.

अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये :

शाडू मातीच्या मूर्तींच्या वापरासाठी शहरात जनजागृती मोहीम राबवणे.

जलप्रदूषण टाळण्यासाठी घरच्या घरीच बादली किंवा कुंडीत विसर्जन करण्याचे आवाहन. फौंडेशनच्या वतीने गणेशोत्सवादरम्यान विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन

निसर्गाचे रक्षण हीच खरी भक्ती

गणरायाची भक्ती करताना निसर्गाचे रक्षण झालेच पाहिजे. शाडू मातीची मूर्ती आणि घरच्या घरी विसर्जन हा पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी मार्ग आहे.

# मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरे ही काळाची गरज – ॲड. युवराज शिंदे

## नर्मदेश्वर महादेव मंदिर उत्सवानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सण, उत्सव तसेच वाढदिवस साजरे करत असताना प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जोपासून समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबविणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेता यावी आणि आजारांचे वेळीच निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, यासाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरे आयोजित करणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी केले.

कल्याण रोड येथील अनुसया नगर परिसरात नर्मदेश्वर महादेव मंदिर उत्सवानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग व ॲड. युवराज शिंदे यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.

या शिबिरामध्ये नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, थायरॉईड तपासणी, क्षयरोग तपासणी तसेच एक्स–रे तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर गरजेनुसार नागरिकांना मोफत औषधांचे वाटप व औषधोपचार करण्यात आले.

यावेळी ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेता येते. अनेक आजारांचे वेळेत निदान होणे आवश्यक असते. त्यामुळे अशा शिबिरांचा नागरिकांना मोठा फायदा होतो. श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त अनुसया नगर परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली.

धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज एकत्र येत असून, त्यातून आपल्या संस्कृती व संस्कारांचे जतन करण्यास मदत होते. धार्मिक उत्सवांसोबतच सामाजिक उपक्रम राबविल्यास त्याचा समाजातील सर्वसामान्य नागरिकांना थेट लाभ मिळतो, असेही ॲड. युवराज शिंदे यांनी सांगितले.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे, सुधाकर बोल्ली, रवींद्र मंडलिक, शेषराव आगळे, दत्तात्रेय मुत्याल, गणेश बेरड, राजू पाटोळे, डॉ. स्मिता म्हस्के, डॉ. गौरव देशमुख, डॉ. ऋतुजा रणदिवे, वर्षा कुलथे, राज्यश्री धोंगडे, कविता लाहोर, विकास गीते, अमोल लांडे, छाया खराडे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

### एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटीची सखोल चौकशी करा

विद्यार्थ्यांनी मेहनत का करावी, असा गंभीर प्रश्न या घटनेमुळे निर्माण झाला आहे. अशा प्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण, निराशा आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.''विद्यार्थ्यांना उपकार नकोत, न्याय हवा; अधिकारी होण्याचा मार्ग पैशाचा नव्हे, तर ज्ञान, गुणवत्ता आणि प्रामाणिक मेहनतीचा असला पाहिजे,'' अशी भूमिका पक्षाच्या वतीने मांडण्यात आली. पेपरफुटीमागील संपूर्ण साखळी, त्यामागील आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा तपास करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.यापूर्वीही स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणि विश्वास निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असताना पुन्हा पेपरफुटीचे प्रकरण समोर येणे ही अत्यंत गंभीर व संतापजनक बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे. एका परीक्षेतील गैरप्रकारामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाऊ नये, ही शासनाची जबाबदारी असल्याचेही पक्षाने स्पष्ट केले.या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे व युवक उपजिल्हाध्यक्ष प्रकाश पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले यावेळी युवक जिल्हाध्यक्ष रामेश्वर निमसे, नगर तालुका अध्यक्ष शरद पवार, नामदेव पवार, महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, फारुख रंगरेज, समीर पठाण, अजर शेख, रामदास ससे, चंद्रकांत पवार, राम झिने, आकाश निमसे, महेश पवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका

जामखेड येथील सदाफुले वस्ती, कुरेशी मोहल्ला परिसरातील जमीर कुरेशी याच्या घरामागील मोकळ्या जागेत कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून आरोपी मोहंमद साद कुरेशी (वय १९, रा. सदाफुले वस्ती, जामखेड) यास ताब्यात घेतले. घटनास्थळावरून सुमारे तीन लाख रुपये किमतीची तीन गोवंशीय जनावरे हस्तगत करण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरोधात जामखेड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैध गुटखा विक्रेत्यांवर सुपा, श्रीगोंद्यात छापे

या कारवाईदरम्यान एकूण ३ गुन्हे दाखल करून ५ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे: सुप्यात दोन ठिकाणी केलेल्या कारवायांमध्ये आरोपी गणेश किसन गवळी (वय ३३, रा. अपधुर, पारनेर) यास ताब्यात घेण्यात आले असून स्वप्नील साबळे (रा. रुई छत्रपती) हा फरार आहे. तसेच एजाज निजाम तांबोळी (वय २१, रा. बँक कॉलनी, सुपा) याच्यावर कारवाई करण्यात आली.श्रीगोंद्यात आरोपी प्रवीण सतीश गायकवाड (रा. लोणी व्यंकनाथ) यास ताब्यात घेतले असून यश दळवी (रा. श्रीगोंदा) हा फरार आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे, पोउपनि सेदवाड, अंमलदार अतुल लोटके, भीमराज खर्से, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, किशोर शिरसाठ, अरुण मोरे, बिरप्पा करमल, राहुल द्वारके, शामसुंदर जाधव, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, योगेश कर्डीले व भगवान धुळे यांच्या पथकाने केली.

### नेवाशात १७० किलो गांजासह ५० झाडे जप्त

आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या नशामुक्त अहिल्यानगर अभियानाअंतर्गत अप्पर पोलीस अधीक्षक वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या पथकातील पीएसआय विकास पाटील, अंमलदार काळोखे, वाघमोडे, शेळके, गाजरे, बर्डे, वैद्य, गवळी, वाघ, नारायण दमाळे, महिला अंमलदार गीता पवार, सुमित करंजकर आणि होमगार्ड सांगळे यांनी ही कारवाई केली.

### भुईकोट किल्ला विकासाला गती

दूर झाला आहे.

भुईकोट किल्ल्याचा होणार कायापालट

भुईकोट किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना पर्यटकांसाठी आधुनिक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून परिसरातील पायाभूत सुविधांपर्यंत विविध विकासकामे केली जाणार आहेत. यामध्ये भव्य प्रवेशद्वार, वाहनतळ आणि स्वच्छतागृहांची सुविधा उभारण्यात येणार आहे. तसेच किल्ल्याच्या ऐतिहासिक तटबंदीचे संवर्धन करून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास आणि वास्तूचे महत्त्व समजावे यासाठी इंटरप्रिटेशन सेंटर उभारण्यात येणार आहे. किल्ल्याच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचे आकर्षण ठरणाऱ्या कामांमध्ये बुरुज क्रमांक १ ते ११ पर्यंत सुमारे १३७० मीटर लांबीचा नेचर वॉकवे प्रस्तावित आहे. किल्ला परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मुक्त नाट्यगृह उभारण्यात येणार असून, परिसरातील प्रकाशव्यवस्था सुधारण्यासाठी सोलर स्ट्रीट लाईटिंग करण्यात येणार आहे.

ऐतिहासिक वारसा जपत पर्यटनाला नवी दिशा

भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासातील महत्त्वाचा वारसा आहे. त्यामुळे या विकास प्रकल्पात किल्ल्याचे मूळ ऐतिहासिक स्वरूप आणि वास्तूचे महत्त्व जपत पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. किल्ल्याच्या संवर्धनासोबत पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध झाल्याने भविष्यात भुईकोट किल्ला अहिल्यानगरच्या पर्यटन विकासाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची अपेक्षा आहे. सामंजस्य करार झाल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीला वेग येणार असून, संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. भारतीय पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पर्यावरण विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक मान्यतांचाही त्यात समावेश आहे. घोषणेपासून मंजुरीपर्यंत आणि प्रशासकीय प्रक्रियेपासून आता सामंजस्य करारापर्यंत पोहोचलेल्या या महत्त्वाकांक्षी भुईकोट किल्ला विकास प्रकल्पाला अखेर प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अहिल्यानगरच्या ऐतिहासिक वैभवाला पर्यटन विकासाची जोड मिळणार असून, भुईकोट किल्ल्याचे रूपडे बदलण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल पडले आहे.